(1)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००१

क्र. नाविमं/उ.मा./अ-१/1475
नाशिक - ४२२ ००१.
दिनांक :- ३१/०८/२०१९

प्रति,
प्राचार्य,
-------------------
-------------------

विषय : जुलै-ऑगस्ट-२०१९ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व संपादणूक अहवाल पाठविणेबाबत...

जुलै-ऑगस्ट- २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या एकूण ------------- मुळ गुणपत्रिका व विद्यार्थी संपादणूकीचा अहवाल (उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय रजिस्टर) या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

उपरोक्त साहित्य प्राप्त होताच सदर साहित्य शाळा/कनिष्ठ महाविद्यालय रजिस्टरनुसार बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करुन पोहोच पावती त्वरित या कार्यालयाकडे पाठवावी. सदर गुणपत्रिका संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. एखाद्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका आपणास प्राप्त न झाल्यास मंडळ प्रतिनिधींकडे त्याच वेळी किंवा दुस-या दिवशी फॅक्सद्वारे/हस्तपोच माहिती मंडळास कळविल्यासच दखल घेण्यात येईल. विलंबाने त्रुटी कळविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

जर गुणपत्रकातील नोंदीत काही तफावत / चुका / त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत आवश्यक कागदपत्रासह तसे या कार्यालयास तात्काळ निदर्शनास आणून मुळ गुणपत्रक दुरुस्तीसाठी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. विद्यार्थाच्या नावातील दुरुस्ती असल्यास आपल्या उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे जनरल रजिस्टर व त्याची छायाप्रत मंडळात समक्ष सादर करणे आवश्यक आहे. नाव दुरुस्तीबाबत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे लेखी पत्र व मंडळाच्या फॉर्म नं. १ वर मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक यांची स्वाक्षरी घेवून प्रत्येक दुरुस्तीसाठी शुल्क राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे/बँक ऑफ इंडियाच्या चलनाद्वारे सादर करावे. नाव दुरुस्ती प्रस्तावासोबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची व इ. १० वी उत्तीर्णतेबाबतचे गुणपत्रक/प्रमाणपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांना मंडळाने गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिली आहे, त्याबाबतची नोंद मंडळाने वितरित केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय रजिस्टरमध्ये आहे. तसेच गैरमार्गाबाबत स्वतंत्र अधिसूचना (डिबार्ड यादी) मध्येही आहे. त्याप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांना आपण लेखी कळवावे. सदरहू गुणपत्रिकांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यापुर्वी गुणपत्रिका आपल्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचीच असल्याची व गुणपत्रिकेवर मा. विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खात्री करुनच संबंधित विद्यार्थ्यांना द्यावी. तसे नसल्यास ती गुणपत्रिका मंडळाकडे त्वरित परत पाठवावी किंवा मंडळ कार्यालयाशी दुरध्वनीद्वारे त्वरीत संपर्क साधण्यात यावा.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक - ४२२ ००१.

(2)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००१.

क्र. नाविमं/उ.मा./अ-१/1475
नाशिक - ४२२ ००१.
दिनांक :- ३१/०८/२०१९

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
(जे. )

विषय:- जुलै-ऑगस्ट -२०१९ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या विकल्प फॉर्मबाबत..
संदर्भ:- राज्य मंडळ कार्यालयाचे क्र. रा.मं./परीक्षा-८/३६५०/दि.१५/०५/२०१३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट-२०१९ परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका मंडळाकडे उपलब्ध आहे.

गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारणे अथवा नाकारणेबाबत विकल्प देण्याचा अधिकार आहे. सदर विकल्पाचा नमुना या पत्रासोबत आपणास पाठविण्यात येत आहे.

गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. सुधारित गुणपत्रिका बदलून घेणेसाठी निकाल जाहिर झाल्यानंतर एक महिन्यात त्वरित विकल्प देणे अनिवार्य राहील.
२. गुणपत्रिका वितरीत केल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत विकल्प दिल्यास सुधारित गुणपत्रिका विनामुल्य देण्यात येईल.
३. विकल्प देण्यास विलंब झाल्यास तद्नंतरच्या एक महिन्याकरिता रु.१००/- शुल्क आकारुन सुधारित गुणपत्रिका देण्यात येईल.
४. गुणपत्रिका वितरीत केल्यानंतर दोन महिन्यापासून ते सहा महिने कालावधी शुल्क रु.२००/- आकारुन सुधारित गुणपत्रिका देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त १ ते ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून विकल्प भरुन घेण्याची व तो विकल्प मंडळाकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी, विद्यार्थ्यांने वरील मुदतीत विकल्प न दिल्यास त्यांना पूर्वीची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे, असे गृहित धरण्यात येवून पुढील कार्यवाही मंडळाकडून करण्यात येईल. विद्यार्थ्यास गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत जुलै-ऑगस्ट- २०१९ परीक्षेचे गुणपत्रक पाहिजे असल्यास त्याचे या पूर्वीच्या परीक्षेचे मुळ गुणपत्रक विकल्प फॉर्म सोबत आपल्या पत्रासह मंडळाकडे जमा करावे, त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रिका देण्यात येईल तसेच विद्यार्थ्यास या पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका (संपादणूक) मान्य असल्यास त्यानुसार विकल्प आपल्या पत्रासह मंडळाकडे जमा करावा.

विद्यार्थ्यांने विकल्प दिल्यानंतर त्यानुसार सदर विद्यार्थ्याची नाकारण्यात आलेल्या या पूर्वीच्या परीक्षेची संपादणुक आपणास पाठविण्यात आलेल्या शालेय अभिलेख (S.R.) /कनिष्ठ महाविद्यालय (C.R) मध्ये रद्द करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास पाठवावा.

सोबत :- विकल्प फॉर्म नमुना

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक - ४२२ ००१.

# गुणसुधार / श्रेणीसुधार योजना - विकल्प फॉर्म

मी ------------------------------------------------ जुलै-ऑगस्ट- २०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस गुणसुधार / श्रेणीसुधार योजनेअंतर्गत ------------------------------------------------ या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालो आहे. माझी नविन संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक :- एस ________

| अ.क्र. | विषयाचे नाव | संपादित केलेले गुण / श्रेणी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | पर्यावरण शिक्षण | |
| ८ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | |

एकूण गुण :- ______ टक्केवारी :- ______

मी यापूवी फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस ------------------------------------------------ या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालो आहे. त्यामधील संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक :- एस ________

| अ.क्र. | विषयाचे नाव | संपादित केलेले गुण/श्रेणी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | पर्यावरण शिक्षण | |
| ८ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | |

एकूण गुण :- ______ टक्केवारी :- ______

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी ------------------------------------------------ असे लिहून देतो की, फेब्रुवारी-मार्च २०१९/जुलै-ऑगस्ट-२०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्वीकारण्यास तयार आहे.

तसेच फेब्रुवारी-मार्च २०१९/जुलै-ऑगस्ट-२०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने त्या परीक्षेची संपादणूक रद्द करण्यास माझी संमती आहे.

विद्यार्थ्याचे नाव :-
विद्यार्थ्यांची स्वाक्षरी :-

प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का.
कनिष्ठ महा. सांकेतिक क्र.- जे

(4)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००१.

क्र. नाविमं/उ.मा./अ-१/ ४९४
नाशिक - ४२२ ००१.
दिनांक :- ०३/०६/२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हे

विषय :- माहे फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांना अनुज्ञेय सवलतीबाबत...

संदर्भ :- १. अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या सोयी/सवलतीसंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दिनांक ०८/०१/२०१६ रोजीचा शासन निर्णय.
२. अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांना लेखनिक मिळणेसंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दिनांक १५/०२/२०१६ रोजीचा शासन निर्णय.
३. दि.१६/१०/२०१८ रोजीचा शासन निर्णय.

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील मंडळ मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, मंडळामार्फत घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांना मंडळामार्फत शासन आदेशानुसार सवलती देण्यात येतात. तसेच संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करावे. संबंधित विद्यार्थ्यांना अशा सवलती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सध्या सदर विद्यार्थ्यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे मुख्याध्यापक/प्राचार्य पातळीवर छाननी न करताच मंडळाकडे पाठविली जातात. त्यामुळे त्या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करावा लागतो व ही प्रमाणपत्रे विलंबाने म्हणजेच मे-जून पर्यंत सादर केली जातात. परिणामी असे विद्यार्थी देय सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपंग विद्यार्थी अनुज्ञेय सवलतीपासून वंचित राहू नये त्या अनुषंगाने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) उपरोक्त फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची वैद्यकिय प्रमाणपत्राची छायांकित प्रत प्रमाणित करुन प्रस्तुत शैक्षणिक वर्षात दिनांक १४/०८/२०१९ पर्यंत मंडळास सादर करावीत.

२) विद्यार्थ्यांच्या वैद्यकिय प्रमाणपत्रावरील संपुर्ण नाव व जनरल रजिस्टर मधील नाव सारखेच आहे याची खात्री करावी त्यामध्ये तफावत असता कामा नये. नावात तफावत असल्यास रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर विद्यार्थ्यांचे/पालकांचे प्रतिज्ञापत्र वैद्यकिय प्रमाणपत्रासोबत मंडळास सादर करावे किंवा जनरल रजिस्टर मधील नावाप्रमाणे वैद्यकिय प्रमाणपत्र मंडळास सादर करावे. मुळ वैद्यकिय प्रमाणपत्राची व अपंगत्वाची खात्री करुनच प्रस्ताव दि. १४/०८/२०१९ पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास रु.२००/- दंड दिनांक ३१/०१/२०२० पर्यंत आकारण्यात येईल.

३) वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये अपंगत्वाची टक्केवारीची नोंद असणे आवश्यक आहे. वैद्यकिय प्रमाणपत्रे विहीत नमुन्यात असणे आवश्यक आहे. अपंगत्वाची खात्री करण्यासाठी त्याच शैक्षणिक वर्षातील फोटो वैद्यकिय प्रमाणपत्रावर चिटकवून मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी साक्षांकित करणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी. सदरच्या सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या नजरेस ठळकपणे आणाव्यात.

४) अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यास जिल्हा शल्य चिकित्सकामार्फत प्राप्त झालेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रावर नमुद केलेल्या अपंगत्वाच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे अपंगत्वाचा प्रकार व सांकेतांक क्रमांक सोबत दिलेल्या तक्त्यात नमुद करावा. तसेच अपंगत्वाचा प्रकार व सांकेतांक क्रमांक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र भरतांनादेखील नमुद करावा.

| अ.क्र. | अपंगाचा (दिव्यांग) प्रकार | सांकेतांक क्रमांक (कोड नंबर) | अ.क्र. | अपंगाचा (दिव्यांग) प्रकार | सांकेतांक क्रमांक (कोड नंबर) |
|---|---|---|---|---|---|
| | | | १२ | मज्जासंस्थेचे तीव्र आजार | 12 |
| १ | अंशता अंध/पूर्णता अंध | 1 | १३ | अध्ययन अक्षम | 13 |
| २ | कुष्ठरोगातून बरे झालेले निवारित | 2 | १४ | मतिमंद | 14 |
| ३ | कर्णबधिर | 3 | १५ | मल्टीपल स्क्लेरॉसिस | 15 |
| ४ | अस्थिव्यंग | 4 | १६ | वाचा व भाषा अक्षमत्व | 16 |
| ५ | शारीरीक वाढ खुंटणे | 5 | १७ | थॅलस्सेमिया | 17 |
| ६ | बौध्दिक अक्षम (मतिमंद) | 6 | १८ | हिमोफिलीया | 18 |
| ७ | बहुविकलांग | 7 | १९ | सिकल सेल | 19 |
| ८ | मनसिक आजार | 8 | २० | ॲसिड ॲटॅक व्हिक्टिम | 20 |
| ९ | ऑटिस्टिक (स्वमग्न) | 9 | २१ | पार्किनसन्स | 21 |
| १० | सेरेब्रल पाल्सी | 10 | २२ | इतर आजारामुळे शालेय शिक्षणात अडचणींत येणा-या विदयार्थ्यांबाबत | 22 |
| ११ | स्नायुंची विकृती | 11 | | | |

उपरोक्त पध्दतीनुसार विद्यार्थ्यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये नमुद करुन मंडळ कार्यालयाकडे दरवर्षी दिनांक १४ ऑगस्टपर्यंत पाठविण्यात यावीत, असे कळविण्यात येवून सुध्दा काही उच्च माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या परीक्षेत याप्रमाणे कार्यवाही न करता विलंबाने प्रस्ताव सादर केले होते. परिणामी त्यामुळे काही विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. तरी याबाबत मुख्याध्याकांना/प्राचार्यांना पुन:श्च कळविण्यात येते की, अपंग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव दरवर्षी १४ ऑगस्टपर्यंतच स्विकारले जातील. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रस्ताव निर्धारित दिनांकानंतर प्राप्त झाल्यास प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. विलंबाने प्राप्त झालेले अपंग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव नाकारण्याच्या मंडळाच्या निर्णयामुळे संबंधित विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून आपणावर राहील, याची नोंद घ्यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक - ४२२ ००१.

# उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च— २०२०

## अपंग (दिव्यांग) विदयार्थ्यांची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जंनरल रजिस्टर मधील अनुक्रमांक | अपंग (दिव्यांग) विदयार्थ्यांचे नांव | अपंग (दिव्यांग) विदयार्थ्याने घेतलेले विषय, कोड क्रमांक व माध्यम | | | अपंगत्वांचा (दिव्यांग) प्रकार | | | वैदयकिय प्रमाणपत्रात कोणतीही त्रुटी नाही | अपंग (दिव्यांग) विदयार्थ्यांचा फ़ोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विषय | कोड क्रमांक | माध्यम | टक्केवारी | प्रकार | कोड क्रमांक | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

प्राचार्य स्वाक्षरी

क.म.विदयालय शिक्का